# २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा आढावा

**प्रा. मनोज श्रीकृष्ण मगर**, राज्यशास्त्र विभाग,
म.वि.प्र.समाजाचे जि.एम.डी.आर्ट्स बि.डब्ल्यू. कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, सिन्नर.

**प्रस्तावना :**

२०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी झालेल्या मतदानानंतरच्या मतमोजणीमुळे कल स्पष्ट झाला आहे . महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजप, शिवसेना युतीला बहुमत मिळाले असले तरी मात्र, भाजपला मागील वेळेपेक्षा कमी जागांवर यश मिळाल्याचे दिसत आहे. तर, शिवसेनेने युतीमध्ये कमी जागा घेऊनही मुसंडी मारली आहे. काँग्रेस-राष्ट्रवादीने ही जोरदार लढत देत 'कमबॅक' केल आहे.भारतीय जनता पार्टीला १०५ जागांवर विजय मिळत असल्याचे दिसत आहे तर शिवसेनेच्या जागांमध्ये वाढ झालेली दिसत आहे.गेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपला १२२ जागा मिळाल्या होत्या त्यामुळे त्यांच्या जागांमध्ये आता घट होत आहे असे दिसून येत आहे. भारतीय जनता पार्टीने या निवडणुकीत मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह इतर भागांमध्ये सर्वाधिक प्रयत्न केले होते. या निवडणुकीत काँग्रेस-राष्ट्रवादीन अपेक्षित असे यश जागा प्राप्त केल्या आहेत. याचा २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी आढावा घेणार आहोत.

**२०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुक :**

निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या तारखांची घोषणा केली. महाराष्ट्रा विधानसभा निवडणूक एकाच टप्प्यात घेतली जाणार आहे असे सूचित केले त्यानुसार २१ ऑक्टोबरला मतदान झाले व २४ तारखेला निकाल जाहीर केला गेला . या निवडणुकीत निवडणूक आयुक्त सुनील अरोरा यांनी सर्वच राजकीय पक्षांना आवाहन केले हाते की, निवडणुकीत सर्वच राजकीय पक्षांना प्लास्टिक वापर करू नये तसेच प्रचार सामुग्रीत त्यांनी प्लास्टिकचा वापर टाळावा. तसेच पर्यावरणपूरक अशा निवडणूक पार पाडण्यात सहकार्य करावे अशी विनंती करण्यात आली होती. या निवडणुकीत महाराष्ट्रात ८ कोटी ९४ लाख मतदार आहेत. महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ ९ नोव्हेंबर संपुष्टात येत आहे.

**महाराष्ट्र विधनासभा निवडणुकीचे निकाला :**

**महाराष्ट्र विधनासभा निवडणुकीचे पक्षानिहाय निकाल**

| अ.नु | पक्ष | जिंकलेल्या जागा | मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | भाजप | १०५ | २५.७५ |
| २ | शेवसेना | ५६ | १६.४१ |
| ३ | राष्ट्रवादी | ५४ | १६.७२ |
| ४ | काँग्रेस | ४४ | १५.८७ |
| ५ | अपक्ष | १३ | १८.६८ |
| ६ | बहुजन विकास आघाडी | ०३ | - |
| ७ | एमआयएम | ०२ | १.३४ |
| ८ | समजावादी पक्ष | ०२ | ०.२२ |
| ९ | प्र.जनशक्ती | ०१ | - |
| १० | माकप | ०१ | ०.३७ |
| ११ | ज.सु.शक्ती | ०१ | - |
| १२ | क्रा.शे.पक्ष | ०१ | - |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | मनसे | ०१ | २.२५ |
| १४ | शेकाप | ०१ | - |
| १५ | रासप | ०१ | - |
| १६ | स्वाभिमानी | ०१ | - |
| १७ | नोटा | ०० | १.३५ |

संदर्भ : महाराष्ट्र टाईम्स २४ /११/२०१९

**महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालाची ठळक वैशिष्ट्ये:**

**१)भाजपची वाटत होती तितकी ताकद नव्हती :**

भाजपची वाटत होती तितकी ताकद या निकालांमधून दिसत नाही. भाजप आणि शिवसेना यांच्यातलं सत्तेचं संतुलन फार नाजूक असेल. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस संपली अशी चर्चा आता करता येणार नाही अस म्हणता येईल.

**२)शरद पवार यांचे लोकसभेनंतर सतत प्रयत्न**

लोकसभेच्या निकालांनंतरचा काही काळ आठवला तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी दुष्काळी भागाचे दौरे केले. लोकसभेचा निकाल आपल्याविरोधात जाऊनही लगेच कामाला लागणे, दारुण पराभव होऊनही राजकारणात उभं राहाण्याची तयारी जे राजकीय पक्ष, नेते दाखवतात, ते टिकून राहाण्याची शक्यता असते.त्यामुळेच जेथे भाजपच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पर्याय आहे असे लोकांना दिसून लागले त्यामुळे जिथे शक्य आहे तिथे लोक राष्ट्रवादी काँग्रेसच्या मागे उभे राहिले हे कारण भाजपच्या जागा कमी होण्याचे कारण असावे असे वाटते. तसेच भाजपच्या जागा कमी होण्यामागे शरद पवार आणि त्यांचा राष्ट्रवादी पक्ष कसा लढला हे सुद्धा कारण असावे. आपण जर यांना मत दिलं तर ते सरकारविरोधात भांडतील, आपलं मत मांडतील असा विश्वास लोकांना वाटला. त्यामुळे लोकांनी राष्ट्रवादी काँग्रेसला मतदान केले हे निकाला वरून स्पष्ट होते.

**३)लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये वेगवेगळे मुद्दे-**

विधानसभा निवडणुकीसाठीही पंतप्रधान आणि केंद्रीय नेतृत्वाने मुद्दे भाजपने केले . त्याच्या प्रत्येक जाहीर सभेत स्थानिक मुद्द्यांन ऐवजी राष्ट्रीय मुद्दे प्रभावी होते. "नरेंद्र मोदी आणि पंतप्रधानाचे नेतृत्त्व हे लोकसभा निवडणुकीत महत्त्वाचे असणारे मुद्दे विधानसभा निवडणुकांत तितके प्रभावी नाहीत. "मतदानाची टक्केवारीचा विचार केल्यास राज्यात भाजपच्या मतांची टक्केवारी स्थिर दिसून आली तर तिचा विचार करणे आवश्यक आहे. केंद्र पातळीवर लोकसभा निवडणुकीत आम्ही भरभरून मत मोदींना देतो मात्र विधानसभेसाठी मात्र असे झाले नसल्याचे दिसते. या निकालांमधून भाजपचा विजय झाला किंवा विरोधी पक्षाला भाजपचा पूर्ण विजया झाला म्हणता येणार नाही तसेच यातून विरोधी पक्षाला चेतना मिळाली असे म्हणावे लागेल.

**४)कमी जागांवर निवडणूक लढवणे-**

गेल्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी स्वबळावर लढली होती मात्र यंदा दोन्ही पक्षांमध्ये युती असल्यामुळे भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेच्या वाट्याला गेल्या वेळेपेक्षा कमी झाल्या आहेत.यावेळेस त्यांना कमी जागा लढता आल्या. त्यामुळे त्यांनी ८०टक्के जागा जिंकल्या तरी त्या १२५ कमी राहणारा होत्या. या निवडणुकीत जिंकलेल्या जागा पाहाता भाजप आणि शिवसेनेचा स्ट्राइक रेट तोच असल्याचे मत व्यक्त केले जाते.

**५)पक्षांतर आणि अंतर्गत धुसफूस-**

भाजपला आज बसलेल्या फटक्यामागे पक्षांतर्गत धुसफूस हे कारण असावे तसेच ऐनवेळेला काँग्रेस-राष्ट्रवादीसारख्या इतर पक्षांमधून लोक आपल्या पक्षात घेणे हेसुद्धा कारण आहे. कारण निवडणुकीच्या वेळी आयाराम लोकांन पक्षात घेऊन त्यांना तिकीट दिले गेले आहे. यातून असंतोष निर्माण झाला असणार. तसेच काँग्रेस-

राष्ट्रवादीमधून ऐनवेळेला नेते पक्षात गेतल्यामुळे भाजपचे परंपरगत निष्ठावंत दुखावले गेले ज्याचा परिणाम निवडणुकीच्या निकालावर झाला

**६)स्थानिक मुद्दे महत्त्वाचे-**

धर्मपाल मेश्राम, भाजप प्रवक्ते म्हणतात, "आमच्या पक्षानं मतदारांना गृहित धरलं नाही. आम्ही गेल्या पाच वर्षांमध्ये लोकांचा सन्मान करून जितकं काम करता येईल तितके केले. स्थानिक मुद्दे कधीकधी अचडणीचे ठरू शकतात. २०१४आणि २०१९ या निवडणुकांची तुलना होऊ शकत नाही. त्यावेळेस आम्ही विरोधी पक्षात होतो आता आम्ही सरकारची कामी घेऊन लोकांच्या समोर गेलो आहोत.

**७)उन्माद पसंत नाही-**

काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी एकत्रित प्रामाणिकपणे प्रयत्न केले. सत्तेचा उन्माद लोकांन पसंत नाही. लोकांना जमिनीवर पाय ठेवून काम करणारे हवे असतात हे या निवडणुकीतून दिसून आलं असं मत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केलं. पक्षांतराच्या निर्णयाला लोकांनी पाठिंबा दिलेला नाही. जे पक्ष सोडून समोर जाऊन उभे राहिले त्यांच्याबाबत लोकांनी अनुकूल निर्णय दिला नाही. सकृतदर्शनी ज्यांनी पक्षांतर केले त्यांच्याबाबत नकारात्मक भावना व्यक्त झाली असं मत पवार यांनी व्यक्त केलं.

सारांश :

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजा व शिवसेना याच्या युतीला पूर्ण बहुमत मिळाले असले तरी यांची सत्ता येईल का या बाबत अजून हि साशंका आहे. कारण शिवसेनाचा निकालापासून मुख्यमंत्री पदाबाबत आग्रही भूमिका आहे. यातून दोन्ही पक्षामध्ये तणाव निर्माण झाल असून महाराष्ट्र राजकारणा शिवसेना, काँग्रेस-राष्ट्रवादी अशी नवी आघाडी आकाराला येऊ लागली आहे. ज्यातून महाराष्ट्राच्या राजकारणाची दिशा बदलण्यासा होणार आहे.

संदर्भ :

१. तुकाराम जाधव ,अभय कांता,विवेक घोटाळे,विजय कुंजीर,महेश शिरपूरकर, ‘‘महाराष्ट्राचे राजकरण नव्या वळणावर’’, द युनिक ऑकादमी,पुणे ,ऑगस्ट २०१५.
२. व्होरा राजेंद व पळशीकर सुहास,’’महाराष्ट्रातील सत्तातंतर’(दोन अस्वस्थ दशके)’’, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.
३. सुहास पळशीकर, ‘‘राजकारणाचा ताळेबंद’’,साधना प्रकाशन,२०१३.
४. दैनिक वर्तमानपत्र